३६६२/१९

२५ JUL 2019

# परिपत्रक क्रमांक ५५६ /२०१९ दिनांक २५/७/२०१९

पहा — १. मा. धर्मादाय आयुक्त यांचे परिपत्रक क्र. ४०२ दि. २०.१०.२०१४
२. मा. धर्मादाय आयुक्त यांचे परिपत्रक क्र. ५४० दि. १३.६.२०१८
३. शासन परिपत्रक क्र. समय १०१९/प्र.क्र.२८/१८(र. व का.) मंत्रालय, मुंबई दि. ४.६.१९

असे निदर्शनास आले आहे की, धर्मादाय संघटनेतील अधिकारी/कर्मचारी हे शासनाने ठरवून दिलेली कार्यालयाची वेळ पाळत नाहीत.

त्याचप्रमाणे असेही निदर्शनास आले आहे की, धर्मादाय संघटनेतील न्यायिक कामाचे वेळेबाबत संपूर्ण राज्यात सुसुत्रता आढळून येत नाही, त्यामुळे पक्षकार/वकील, इत्यादी यांना गैरसोय होऊ शकते व वाद निर्माण होण्याची शक्यता टाळता येत नाही.

तरी सर्व अधिकारी/कर्मचारी हयांनी शासनाने ठरवून दिलेल्या वेळेतच कार्यालयात हजर व्हावे. न्यायिक कामकाजाच्या वेळेमध्ये सुसुत्रता येणे करीतां सर्व अधिका-यांनी न्यायिक कामाच्या वेळां निश्चित कराव्यात. त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांनी न्यायिक कामकाजावर भर द्यावा व जास्तीत जास्त वेळ प्रशासकीय कामात अडकून न होता न्यायदान कक्षावर (डायस) द्यावा आणि त्याबाबत आपआपल्या वकील संघटनांना सुचना देवून कळवावे. तसेच सुचना आपले कार्यालयीन फलकावर (नोटीस बोर्ड) प्रसिध्द कराव्यात. प्रसिध्द केलेल्या सुचनेची प्रत या कार्यालयास माहितीस्तव पाठवावी.

पुढील परिणाम टाळणेकरीतां, या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

CHARITY ORGANISATION

(संजय ग. मेहरे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत —
१. सर्व धर्मादाय सह आयुक्त
२.सर्व धर्मादाय उप आयुक्त
३.सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
४. कार्यालय परिपत्रक धारिणी
५. संगणक शाखा (संकेतस्थळावर नोंदीसाठी)

मभिसरनोबत/२५०७२०१९